




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १३५ •गुरूवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# यूजीसी चे नियम धाब्यावर बसवत शिरूर येथील कालिकादेवी महाविद्यालयात अपात्र प्राध्यापकाची निवड

## निवड समिती संशयाच्या भवऱ्यात ; आर्थिक देवाण-घेवाणची चर्चा !



**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था संचालित कालिकादेवी महाविद्यालय शिरूर कासार येथे एका प्राध्यापकाची अपात्र असताना निवड करण्यात आली असल्याची माहिती पुढे आली असून या प्रकरणात अपात्र प्राध्यापक मुलाखतीस पात्र नसताना निवड समिती व संस्थेच्या संगणमताने या प्राध्यापकाची नियुक्ती यूजीसी व महाराष्ट्र शासनाच्या सर्व नियमांना धाब्यावर बसवत करण्यात आली आहे. विशेष म्हणजे सहाय्यक प्राध्यापकासाठी कॅश ची मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवल्यानंतर सदरील प्राध्यापकाचा प्रस्ताव सहसंचालकाने दोन वेळेस नामजूर केला. तरीही मोठी आर्थिक देवाण घेवाण च्या माध्यमातून कॅश मध्ये सदरील प्राध्यापकाला सहाय्यक प्राध्यापक म्हणून मान्यता देण्यात आली असून सदरील प्रकरण अत्यंत गंभीर असून पात्र व्यक्तीवर अन्याय करणार आहे.

आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि तत्कालीन निवड समितीने शासनाची व विद्यापीठाची दिशाभूल करून पात्र उमेदवारांना डावलून अपात्र उमेदवार ▶▶ उर्वरित पान २ वर

### • निवड रद्द करण्याची संघटनेची मागणी

**अपात्र असणाऱ्या व्यक्तीला निवड समितीने थेट पात्र करत नियुक्ती प्रदान केली सदरील प्रकार हा आदर्श शिक्षण संस्था संचलित शिरूर कासार येथील कालिका देवी महाविद्यालयातील आहे. सदरील प्रकरणाची माहिती स्वाभिमानी महाराष्ट्र अंडरप्रिव्हिलेज्डू टिचर्स असोसिएशन संघटनेला मिळाल्यानंतर विद्यापीठात या विरोधात तक्रार करण्यात आली मात्र याची दखल विद्यापीठाने अद्यापही घेतली नसल्याने एका अपात्र प्राध्यापकाची निवड संशयाच्या भरत सापडलेली आहे या प्राध्यापकाची नियुक्ती रद्द करण्याची मागणी वरील संघटनेने केली आहे.**

### • डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ कुलगुरू लक्ष देतील का ?

**सदरील प्रकरणात आदर्श शिक्षण संस्था व विद्यापीठ निवड समिती यांच्या मूक संमतीने अपात्र असणाऱ्या प्राध्यापकाची निवड करण्यात आली. या प्राध्यापकाचे पीएचडी नोटिफिकेशन तब्बल पंधरा दिवसांनी मिळाले मात्र यापूर्वीच निवड समितीने या प्राध्यापकाची निवड कोणत्या निकष आधारित केली. या मुलाखतीमध्ये पात्र असणाऱ्या व्यक्तींवर अन्याय करण्यात आला. यूजीसी व महाराष्ट्र शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवण्यात आले. सदरील प्रकरण अत्यंत गंभीर असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे कुलगुरू या गंभीर बाबीकडे लक्ष देतील का ?**

# धर्मादाय उपआयुक्त चौधरी यांनी शिक्षण संस्था, देवस्थान ट्रस्टच्या वादग्रस्त प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी!

## चौकशी करून कारवाईसाठी अनेकांचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक न्यास कार्यालयाचे प्रमुख प्रदीप मगनलाल चौधरी यांनी मागील अनेक दिवसांमध्ये बेकायदेशीर व नियम बाह्य कामे करून लाखोंची माया जमा केल्याच्या तक्रारी अनेकांनी लातूर आणि मुंबई येथील वरिष्ठ कार्यालयाकडे आल्या आहेत. तरी अद्याप या प्रकरणाची कसली ही चौकशी झाली नसल्याने माजी आ. बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, प्रगत विद्या प्रसारक मंडळ कुसळंब ता. पाटोदा आजीव सभासद बाळासाहेब पवार, नामलगाव ता.बीड ग्रामस्थ व देवस्थानचे विश्वस्त, मोहीमाता शिक्षण संस्था मादळमोही ता. गेवराईचे ▶▶ उर्वरित पान २ वर

### • प्रदीप चौधरी यांच्या विरोधात व्यक्त होतोय तीव्र संताप!

**धर्मादाय कार्यालयाच्या माध्यमातून जनतेला आणि संस्थांना योग्य न्याय दिला जात असतो परंतु या धर्मादाय कार्यालयाचे उप आयु प्रदीप चौधरी यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार केल्याचे आरोप होत असल्याने त्यांच्या विरोधात जनतेतून राग व्यक्त होत आहे. प्रदीप चौधरी हे धर्मादाय उपआयु आहेत की आर्थिक व्यवहार करणारे आयु जनतेतून व्यक्त केला जातोय संतप्त सवाल जनतेतून विचारला जात आहे.**

# गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांचे फोटो बॅनरवर दिसणार नाहीत

## अजितदादांच्या सुचनेनंतर जिल्हाधिकारी करणार गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपूर्वी बीडमध्ये सरपंच देशमुख हत्या प्रकरण आणि सरपंच बापू आंधळे खून प्रकरणातील आरोपींचे फोटो मुख्य चौकातील बॅनरवर झळकले होते. तर पालकमंत्री अजित पवार यांच्या दौऱ्यादरम्यान अनधिकृत बॅनरचा विळखा देखील पाहायला



मिळाला. अजित दादांनी अधिकाऱ्यांची कान उघडणी केली.. याची गंभीर दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी यापुढे सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे होर्डिंग वर फोटो लावल्यास कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

मागील सात महिन्यांपासून बीड जिल्हा कायदा आणि सुव्यवस्थेबाबत राज्यात चर्चेत आहे. आणि याच बीडमध्ये नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देणाऱ्या बॅनरवर सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड आणि परळीतील सरपंच बापू आंधळे खून प्रकरणातील आरोपी बबन गित्ते यांचे फोटो झळकले होते. या ▶▶ उर्वरित पान २ वर

# मिरगाव येथील शेतक-याने विष प्राषन करुन केली आत्महत्या



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील गोदापात्राच्या तिराकाठी वसलेल्या मिरगाव येथील एका शेतक-याने शेतातील फवारणीचे औषध प्राषन करुन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

धुराजी पांडुरंग जगताप वय वर्ष ३५ आसे विष प्राषन केलेल्या शेतक-याचे नाव आहे. या बाबत अधिक माहिती आशी की मिरगाव येथील शेतकरी नामे धुराजी पांडुरंग जगताप यांना तीन आपत्य असुन दोन मुली व एक मुलगा आहे. जेमतेम दोनच एक्कर शेती आसल्याने सातत्याने लेकरांचे शिक्षण व लग्नाची चिंता चिंता धुराजी यांना सतावत होती. एक मुलगी लग्नायोग्य झाल्याने काही कर्ज तर काही ऊसनवारी करून मुलीचे लग्न तर केले पण काही प्रमाणात झालेले कर्ज व उर्वरित दोन लेकरांचे शिक्षण या साठी धुराजी जगताप शासकीय कर्ज काढण्याच्या तजवीज मध्य सतत प्रयत्णरत होते. कुठल्याही शासकीय बँके कडुन विविध प्रयत्न करुन देखील कर्ज मिळत नसल्याचे जानवल्या नंतर धुराजी पांडुरंग जगताप यांनी हाताश होऊन शेवटी शेतातील औषध प्राषन करुन आत्महत्या केल्याची घटना मिरगाव येथे घडली असुन गरजवंत व अल्प शेती आसलेल्या शेतक-यांना शासन व प्रशासन साम ाज्यास्याने हाताळत नसल्याने हाताश होऊन धुराजी पांडुरंग जगताप यांनी आत्महत्या केल्याचे बोलल्या जात आहे.

# गुरांच्या गाड्या अडविण्याचा अधिकार खाजगी लोकांना नाही

## अवैध वाहतूक होत असेल तर पोलिसांना कळवा, पोलीस कारवाई करतील : विशेष पोलीस महानिरिक्षक

**बीड । प्रतिनिधी**

तथाकथीत गोरक्षकांकडून गुरांची वाहने अडवून व्यापाऱ्यांना मारहाण होत असल्याने गेल्या काही दिवसापासून कुरेशी संघटनेने जनावरांच्या व्यापारावर बहिष्कार घातलेला आहे. तो बहिष्कार आजही कायम आहे. कुरेशी संघटनेने राज्य सरकारला आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दिलेले आहे. शासनाशी चर्चा देखिल केलेली आहे. राज्य सरकारने याची दखल घेत शासनाने काही निर्देश पोलीस प्रशासनाला दिले



आहेत. गुरांची वाहतूक करणाऱ्या वाहनांना अडविण्याचा अधिकारी खाजगी लोकांना नाही. अवैध वाहतुक होत असेल तर त्याची माहिती पोलिसांना कळवा पोलीस त्याबाबत कारवाई करतील असे आवाहन राज्याचे विशेष पोलीस महानिरिक्षक डॉ.मनोज कुमार शर्मा यांनी केले आहे.

तथाकथीत गोरक्षकाच्या त्रासाला कंटाळून कुरेशी संघटनेने जनावरांच्या व्यापारावर बहिष्कार घालुन खरेदी विक्री बंद केली आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# माझ्या सदनिकेचे काम पूर्ण होताच मी शासकीय निवासस्थान रिक्त करणार

## शासकीय निवासस्थान संदर्भात आ. श्री. धनंजय मुंडे यांची प्रतिक्रिया

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई शहरातील सातपुडा हे शासकीय निवासस्थान मी रिक्त केले नसल्याबाबत माध्यमांमध्ये वेगवेगळ्या बातम्या येत आहेत. मुंबईतील माझी सदनिका सध्या राहण्या योग्य नसून, त्याठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू आहे. शिवाय माझ्या लहान मुलीची शाळा याच भागात असून माझ्या विविध आजारांवरील उपचारार्थ देखील मला मुंबईत राहणे गरजेचे आहे. मात्र या परिसरात तातडीने भाड्याने घर मिळणे सध्या कठीण



आहे, माझा शोध ही सुरु आहे. माझ्या सदनिकेचे काम पूर्ण होताच मी शासकीय निवासस्थान रिक्त करणार असून, तशी शासनाकडे विनंती केली आहे.

# शहरातील विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागरांनी घेतला नगर परिषदेत आढावा

## महत्वाचे विषय तातडीने मार्गी लावण्याच्या दिल्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाच्या असलेल्या विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१३) रोजी आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहारातील नागरी प्रश्नांवर सविस्तर आढावा घेऊन महत्वाचे असलेले विविध प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.क्षीरसागर यांनी



मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या. बीड शहरातील अनेक नागरी प्रश्न प्रलंबित आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर सातत्याने ▶ उर्वरित पान २ वर

### • शहरातील प्रलंबित ठेवलेले प्रमुख रस्ते ना.अजितदादांच्या पुढाकारातून लवकरच होणार

**बीड शहरातील प्रमुख असलेले छत्रपती शिवाजी महाराज चौक-राजूरी वेस-बलभीम चौक-धोंडीपुरा-सुभाष रोड, राजूरीवेस-बुंदेलपुरा-कटकटपुरा-सुभाष रोड, कारंजा-पिंगळे गल्ली-बुंदेलपुरा, नगर नाका ते पालवण चौक, राजू नगर ते अंकुश नगर या प्रमुख रस्त्यांच्या कामाला ना.अजित दादा पवार यांच्या पुढाकारातून लवकरच प्रत्यक्षात सुरूवात होणार आहे. दरम्यान हे सर्व रस्ते ३ वर्षांपूर्वीच मंजूर झालेले आहेत. परंतु तात्कालीन पालकमंत्री यांनी जाणीवपूर्वक, श्रेयवादातून बीड शहरातील रस्त्यांचे काम प्रलंबित ठेवण्याचे नियोजन केले होते. परंतु ना.अजित दादा पवार यांनी बीड शहराचा जिव्हाळ्याचा प्रश्न लक्षात घेता तातडीने हे रस्ते करण्याच्या सूचना दिल्या असून लवकरच या रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात होणार आहे.**




# ७५० वर्षांचा ज्ञानप्रकाश : आपेगावातून (पैठण) सुरू होणाऱ्या 'माऊली' महोत्सवाला राज्यभर आकार

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंतीनिमित्त आपेगाव , नेवासा , आळंदी , पंढरपूर आदी ठिकाणी वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे . सन २०२५ हे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी ( ७५० वी ) जयंतीचे वर्ष आहे . ही जयंती १५ ऑगस्ट २०२५ रोजी , गोकुळ अष्टमीच्या दिवशी साजरी होईल . महाराष्ट्र शासनाने या वर्षी सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महोत्सव स्वरूपात साजरा करण्याचे परिपत्रक काढले आहे . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने नगर विकास विभागाने हे आदेश जारी केले आहेत .स्थानिक स्वराज्य संस्था , शाळा-महाविद्यालये , वारी परंपरेशी जोडलेल्या संस्था , तसेच सांस्कृतिक संघटनांच्या सहभागातून कीर्तन-महोत्सव , ओवी-वाचन , स्वच्छता-सप्ताह , वृक्षारोपण , ग्रंथ-प्रदर्शने आणि युवकांसाठी निबंध-स्पर्धा , वक्तृत्व-स्पर्धा, पोस्टर-मोहिमा अशा कार्यक्रमांना सुरुवात होत आहे . या सोहळ्याचा केंद्रबिंदू म्हणून माऊलींची जन्मभूमी आपेगाव ता पैठण हे खास प्रकाशझोतात येत असून , नेवासामध्ये ज्ञानेश्वरी पठण आणि आळंदीत संजीवन-समाधी स्मरण सोहळे आयोजित केले जात आहेत .

संत ज्ञानेश्वर यांचा जन्म इ.स. १२७५ ( शके ११९७) , आपेगाव-विठ्ठलपंत-रुख्मिणी दांपत्याच्या पोटी झाला. त्यांना भाऊ-बहिणी निवृत्तिनाथ , सोपानदेव , मुक्ताबाई हे होत. निवृत्तिनाथ यांनी नाथ संप्रदायातील गहिनीनाथ यांच्याकडून दीक्षा घेतली ; ज्ञानेश्वरांनी निवृत्तिनाथांनाच आपले गुरु मानले . इ.स. १२९० मध्ये संत ज्ञानेश्वर यांनी नेवासा येथे 'ज्ञानेश्वरी' ( भावार्थ-दीपिका ) रचली - हे भगवद्गीतेवरील मराठी टिपणग्रंथ , ओवीछंदात आहे . पुढे 'अमृतानुभव' ही तत्त्वज्ञानप्रधान कृति रचली . इ.स. १२९६ मध्ये आळंदी येथे संजीवन-समाधी घेतली . वारी - परंपरेतील आळंदी-पंढरपूर पालखी परंपरेचे केंद्रस्थान आहे . ज्ञानेश्वरांनी मराठीला धर्म-तत्त्वज्ञान व्यक्त करणारी समर्थ भाषा म्हणून प्रतिष्ठा दिली . ओवी या जनभाषेतील छंदात त्यांनी गीतेचे अर्थसुंदर रूप दिले ; यात लोकभाषा , उपमा-अलंकार , आणि तात्त्विक सूक्ष्मता यांचा अप्रतिम संगम दिसतो . अमृतानुभव - मध्ये अद्वैत , आत्म-ब्रह्म ऐक्य , नाम-भक्ती आणि अनुभवप्रधान अध्यात्म यांचे सूक्ष्म विवेचन आढळते ; तर चांगदेव पासष्टी ही ६५ ओव्यांची उपदेशरूपी रचना नम्रता - अहंकारमुक्तीचा संदेश देते . चांगदेवाशी झालेल्या प्रसंगाचे वर्णन - भिंतीवर आरूढ होऊन माउलींनी त्यांचा दर्प निववला - वारकरी परंपरेत प्रसिद्ध आहे .

संत ज्ञानेश्वर यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना

बाल्यावस्था : कुटुंबावर सामाजिक बहिष्कार ; तरीही चारही भावंडांमध्ये अध्यात्म-वैराग्याची ज्योत प्रज्वलित केली. नेवासा ( इ.स. १२९० ) येथे गंगाकाठी प्रवरानदीच्या काठी ज्ञानेश्वरीचा अखंड नाम - स्मरणात झालेला प्रवाह ; माउली बोलतात , श्रोते लिहितात -सच्चिदानंद या शिष्यानं लेखन केल्याचा उल्लेख परंपरेतआहे . पैठण/चांगदेव प्रसंग : योगसिद्धीपेक्षा भक्ती-ज्ञानाचे श्रेष्ठत्व दाखवणारी 'भिंत



चालली' ही लोककथा ; याच पार्श्वभूमीवर पासष्टी आहे . माऊलींनी आळंदी (इ.स. १२९६) येथे संजीवन-समाधी घेतली .

संत ज्ञानेश्वर यांचे प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत .- १ . ज्ञानेश्वरी (भावार्थ-दीपिका)- १८ अध्याय , गीतेचा लोकभाषेतील अर्थ यात आहे . करुणा , कर्तव्य , नामस्मरण आणि समत्व-योग यांचे सुलभ विवेचन यात आहे . २. अमृतानुभव - अनुभवप्रधान अद्वैत , 'कथनी'पेक्षा 'करणी'ला प्राधान्य ; शब्दापलीकडील अनुभूतीचा शोध यात घेतलेला दिसतो . ३.चांगदेव पासष्टी - अहंकारनिर्मूलन, विवेक-वैराग्य , सदाचार यांचा सार म्हणजे वरील ग्रंथ होय .

वारकरी परंपरा, समाजप्रबोधन आणि आजचे संदर्भ : माउलींच्या विचारांत समत्व , मैत्री , परस्पर-भाईबंदकी , सत्कर्माची आवड आणि सर्वकल्याणाचा ध्यास ठळकपणे येतो . वारीतील दिंडी , नामघोष , सामुदायिक श्रमदान , स्वच्छता यांचे सामाजिक-शैक्षणिक महत्त्व आज अधिकच प्रखर झाले आहे . पसायदान ही त्यांच्या विचारांची मूर्त प्रार्थना - धर्म-पंथांपलीकडचा मानवतावादी आशय- आजच्या सार्वजनिक जीवनाला दिशादर्शक ठरते .

माउलींच्या निवडक 'ओव्या' (पसायदानातून ) -

आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे ;
तोषोनि मज द्यावे, पसायदान हे .
जे खळांची व्यंकटी सांडो, तयां सत्कर्मी रती वाढो ;
भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे .
दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ;
जो जे वांछील तो ते लाहो , प्राणिजात.
वर्षत सकळ मंगळी , ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ;
अनवरत भूमंडळी, भेटतु भूतां .
चलां कल्पतरूंचे आरव, चेतना चिंतामणींचे गाव ;
बोलते जे अर्णव, पीयूषाचे .
चंद्रमे जे अलांच्छन, मार्तंड जे तापहीन ;
ते सर्वांही सदा सज्जन, सोयरे होतू .

७५० वी जयंती : काय-काय विशेष ? १५ ऑगस्ट रोजी जन्मभूमी आपेगांव -आळंदी - नेवासा जोडणारी ' ज्ञानयात्रा ' : ग्रंथ व हस्तलिखित प्रतिकृतींचे प्रदर्शन , प्रवचनमाला असेल . विद्यार्थी उपक्रम : 'ओवी बोला- ओवी लिहा', हस्ताक्षर-स्पर्धा , ' ज्ञानेश्वरीतलं विज्ञान ' विषयक प्रात्यक्षिके होतील . सामुदायिक सेवा जसे की नदी-स्वच्छता , वृक्षारोपण , हरित-दिंडी , रक्तदान शिबिरे घेतली जातील . कीर्तन-महोत्सव होतील. वारी परंपरेतील कीर्तनकार , भजन-मंडळे , दिंडी-नृत्य, भारूड यांचे सादरीकरण होणार आहे .

का वाचावी 'ज्ञानेश्वरी'? - भाषेची आपुलकी वाढवणारी प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांनी समजावलेला कर्म - भक्ती -ज्ञान -योग- अगदी आजच्या विद्यार्थ्यांपासून तरुण व्यावसायिकांपर्यंत सर्वांसाठी वाचनीय आहे म्हणून वाचावी . ही लोकशिक्षणाची परंपरा आहे . ग्रंथाभोवती उभा राहिलेला वाचन-सप्ताह , पारायण , कीर्तन यांचा लोकशाही स्वरूपाचा अभ्यासक्रम आहे . यातून मानवतावाद वाढतो . 'मी-तू' भेद निववून मैत्र , सत्कर्म , सर्वकल्याण यांचा आग्रह पसायदानात आहे.

शेवटची समर्पक आठवण :- माउलींच्या ७५० व्या जयंतीचा उत्सव केवळ धार्मिक नाही ; तो भाषा-संस्कृती -मानवतेचा महोत्सव आहे . प्रत्येक शाळा , ग्रामसभा , संस्था आणि घराघरांत 'ओवी-वाचन' सुरू झाले तरच ही जयंती खऱ्या अर्थाने उजळेल . किंबहुना सर्व सुखी या माउलींच्या सार्वत्रिक आशीर्वादात आजचा महाराष्ट्रही सामील होवो !

**- चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके,**
**तहसीलदार, बीड**

◆ पान ९ वरून पुढे...

## यूजीसी चे...

तुपे संजय कारभारी यांची निवड केली होती, यु.जी.सी व महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठाच्या नियमानुसार प्राध्यापक होण्यासाठी किमान पी.जी. ५५ टक्के, सेट/नेट/पीएच.डी. उतीर्ण असणे अनिवार्य होते. या प्रकरणी संजय कारभारी तुपे यांची निवड समितीने मुलाखत घेतली त्या दिवसी त्यांची पीएच.डी. अवार्ड मिळालेला नव्हता निवड झाल्यानंतर १५ दिवसांनंतरचे पीएच.डी. नोटीफिकेशन आहे. यु.जी.सी. च्या नियमानुसार अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवसी तो त्या पदासाठी पूर्णपणे पात्र असेल तरच, अर्ज करू शकतो अध्यक्षांनी संबंधित व्यक्तीकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण घेवाण करून व निवड समितीला मॅनेज करून अपात्र व्यक्तीची निवड केली असा संघटनेचा संशय आहे. संघटनेच्या ही बाब लक्षात आल्या नंतर त्यांना दिलेल्या मूळ मान्यता व त्या आधारावर ए.जी.पी. ७०००, ८००० ची मान्यता रद्द करण्याची तक्रार केली होती, परंतु विद्यापीठाने त्याची दखल घेतली नाही. त्यानंतर संस्थेने तूपे यांच्या सहयोगी प्राध्यापक होण्यासाठी (कॅश अंतर्गत) प्रस्ताव विद्यापीठात सादर केला होता. त्यासाठी निवड समिती घेतली होती. शासन प्रतिनिधी सहसंचालक डॉ. सतिश देशपांडे यांच्या ही बाब लक्षात आल्याने त्यांनी कॅस प्रमोशन करण्यास नकार देऊन संपूर्ण मूळ कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर त्यांची बदली झाली. त्यानंतरचे सहसंचालक डॉ. सुरेंद्र ठाकुर यांची पुनश्च कागदपत्रांची तपासणी करून प्राध्यापक तूपे हे प्राध्यापक पदासाठी अपात्र असल्यामुळे त्यांना कॅस चे फायदे देण्यात येऊ नये व त्यांचा प्रस्ताव विद्यापीठात सादर करू नका, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. या विरूद्धात तूपे संजय कारभारी मा. खंडपीठ उच्च न्यायालय औरंगाबाद येथे याचिका क्रमांक ७४५/२०२४ दाखल केली होती. तिचा निकाल दिनांक ०३/०४/२०२५ रोजी लागता. मा. न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले होते की, विद्यापीठातने या प्रकरणाची गुणवत्तेनुसार तपासणी करावी आणि काही शंका असल्यास महाराष्ट्र सरकारचा सल्ला घेऊन याप्रकरणी निर्णय घ्यावा. मान्यता प्रदान करणाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा करून आपली व महाराष्ट्र राज्याची दिशाभूल करून अपात्र व्यक्तीस कॅस चे म्हणजेचे अपात्र नियुक्तीस पात्र म्हणून नियुक्ती दिलेली आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## धर्मादाय उपआयुक्त...

सचिव वरूनराज सानप, श्रीराम पंचायतन दादेगावचे ता. आष्टी विश्वस्त गंगाधर पोटे, योगेश्वरी देवीचे भक्त ॲड. अनुपमकुमार. बिडकर, अलरशीद शिक्षण संस्था बीडचे पिरजादे अहेमद यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देऊन प्रदीप चौधरी यांनी आतापयरत केलेल्या कामाची व त्यांनी दिलेल्या निकालाची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी केली. सदर निवेदन देताना आ. धनंजय मुंडे आणि आ. विजयसिंह पंडित हे उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील शिक्षण संस्था, देवस्थान ट्रस्ट, सामाजिक संस्था इत्यादी संस्थांचा कारभार ते धर्मदाय उप आयु या ठिकाणाहून चालतो. ह्या कार्यालयाचे प्रमुख प्रदीप चौधरी यांच्यावर बेकायदेशीर व अनियमितता आणि आर्थिक व्यवहारातून काम करत असल्याचे अनेक आरोप होत आहेत. मागील काही दिवसापासून या आरोपाच्या संख्येत वाढ झाली आहे. बीड धर्मादायचे उप आयुक्त श्री.प्र.म. चौधरी यांनी वादग्रस्त शिक्षण संस्था व देवस्थान ट्रस्टच्या प्रकरणात निकाल दिले. या निकालासाठी मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आरोप अनेक संस्था आणि देवस्थानच्या ट्रस्टीच्या वतीने केला जात आहे. दुसरीकडे या बाबत बीड जिल्ह्यातील सार्वजनिक न्यास विभागाचे उप आयु प्रदीप मगनलाल चौधरी यांनी शिक्षण संस्था, देवस्थान ट्रस्टच्या वादाच्या प्रकरणात देण्यात आलेले निकाल हे आर्थिक व्यवहारातून केल्याच्या अनेक तक्रारी लातूर आणि मुंबई येथील वरिष्ठ धर्मादाय कार्यालयाकडे तक्रारदारांनी दिल्या आहेत. परंतु प्रदीप चौधरी यांची अद्याप कसलीही चौकशी झाली नाही. त्यामुळे बीड जिल्ह्यातील अनेक संस्था आणि संस्थेच्या प्रमुखांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन बीडचे उप आयु प्रदीप मगनलाल चौधरी त्यांच्या कार्यकाळात झालेल्या विविध शिक्षण संस्था व देवस्थान ट्रस्टच्या वादग्रस्त प्रकरणांमध्ये झालेल्या निकालाची कसून चौकशी करून प्रदीप चौधरी यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करावी अशी मागणी केली.

## गुन्हेगारी पार्श्वभूमी...

होर्डिंगची राज्यभर चर्चा देखील झाली होती. माध्यमांमध्ये बातम्या

◆ पान ९ वरून पुढे...

आल्यानंतर प्रशासनाने काही बॅनरवर कारवाई केली. मात्र तोपयरत प्रशासनाच्या डोळ्यावर पट्टी होती का? असा सवाल उपस्थित करण्यात आला होता. देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघालं.. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वत...कडे घेतले.. अजितदादा येणार असल्याने कार्यकत्यारची बॅनरबाजीसाठी हमखास चढाओढ पाहायला मिळते.. अजितदादांच्या बॅनरसाठी शेकापच्या माध्यमातून लावण्यात आलेले बॅनर्स काढण्यात आले होते.. त्यामुळे संतप्त झालेल्या कार्यकत्यारनी अजितदादांच्या गाड्यांचा ताफा अडविण्याचा इशारा देखील दिला होता.. हीच बाब लक्षात येताच अजितदादांनी अधिकाऱ्यांची कान उघडणी करत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या.. याच सूचनेनुसार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अजित दादांच्या १५ ऑगस्टच्या दौऱ्यापूर्वी आदेश काढून कोणत्याही सार्वजनिक फलकावरील मजकूर पक्षेपार्ह नसावा.. गुन्हेगार व गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे, गुन्हेगारांचे फोटो त्यावर नसावेत.. असा थेट कागदोपत्री आदेशच काढला आहे... अजित दादांनी केलेल्या सूचना आणि जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या आदेशाचे महायुतीतील पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.. कार्यकर्ता उत्साहाच्या भरात बॅनर लावतो. मात्र त्यावर कुणाचे फोटो टाकायचं? हे लक्षात येत नाही. हा निर्णय स्वागतार्ह असून या आदेशाचे पालन केले जाईल.. असं स्वत... अजितदादांच्या तालुकाध्यक्षांनी सांगितले.

## गुरांच्या गाड्या...

या बहिष्कारामुळे जनावरांचे व्यापार मंदावले आहेत. कुरेशी संघटनेने राज्य शासनाशी चर्चा देखिल केलेली आहे. शासनाने काही निर्देश पोलीस प्रशासनाला दिले आहेत. राज्याचे विशेष पोलीस महानिरिक्षक डॉ.मनोज कुमार शर्मा यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे की गुरांचे अवैध वाहतुक करणाऱ्या लोकांविरूध्द माहिती मिळताच त्या लोकांविरूध्द फे पोलीस किंवा इतर संबंधित अधिकाऱ्यांनीच कारवाई करावी. खाजगी व्यक्तीना कोणत्याही पध्दतीने गाड्या आडवून तपासणी करणे, मारहाण करणे हे कायद्याला अनुसरून नाही. मात्र अवैध गुरांची वाहतुक या बाबत कुठल्याही नागरीकांनी तक्रार केल्यास त्याची तात्काळ तक्रार घेवून

◆ पान ९ वरून पुढे...

कायदेशीर कारवाई करावी. जनावरांची वाहतुक करतांना सर्व नियमाचे पालन करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही याची खात्री करावी तसेच सर्व नियमांचे पालन करणाऱ्या व्यापाऱ्यांची पकडलेली जनावरे परत देण्याबाबत कायदेशीर बाबींची खात्री करून नियमानुसार कारवाई करावी असे निर्देश त्यांनी दिले आहेत.

## शहरातील विविध...

शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. या अनुषंगाने बीड नगरपरिषदेच्या स्तरावरील विविध प्रलंबित विषयांवर आढावा घेण्यासाठी बीड नगरपरिषदेचे नवीन मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि प्रशासनातील अधिकारी यांच्यासमवेत आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठक घेऊन, सविस्तर चर्चा करून आढावा घेतला. तसेच बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाचे असलेले विविध प्रश्न प्रशासकीय स्तरावरून तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या आहेत. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, बीड नगरपरिषदेतील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### ● बैठकीत चर्चा झालेले मुद्दे

- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढवणे व सुशोभीकरण करणे. - चालू असलेल्या विविध विकासकामांची सद्यस्थितीचा आढावा घेतला. - शहरातील स्वच्छता व पाणी पुरवठा बाबत आढावा. - बीड शहरातील पार्किंग व्यवस्था करणेसाठी प्रस्तावित जागा ३७ (ए) प्रस्तावावर निर्णय - घरकुल योजना, विद्युत पुरवठा तसेच सार्वजनिक शौचालय उभारणीबाबत आढावा घेतला - पेठ बीड भागातील मच्छी मार्केट इमारत व जुनी भाजी मंडई येथील मटन मार्केट इमारत तसेच सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथील भाजी मंडई इमारती बाबत आढावा घेतला. - उर्दूघर च्या उभारणीसाठी जागा निश्चित करणे. - कोंडवाडा नूतनीकरण बाबत आढावा घेतला. - STPT planी बाबतच्या कामाचा आढावा घेतला. - मोकाट जनावरांसाठी नुतन कोंडवाडा तयार करणे. - लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती योजनेतंर्गत अनेक विकास कामांना मंजुरी देण्याबाबत चर्चा केली.

◆ पान ४ वरून पुढे...

## सकाळी निवेदन...

येत होती. वृत्तपत्रातून याप्रकरणी बातम्या छापून आल्या होत्या तर दखल घेतली असे दाखवत ग्रेडर वाहनने चिखल पाणी हटवत थातूरमातूर काम करून वेळ काढूपणा काम केले होते. परंतु एका निवेदनाद्वारे सकाळी विनंती केली आणि त्या निवेदनाची दखल घेत दुपारी प्रश्न मार्गी लावला म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांनी निवेदन दिलेल्या सर्व अधिकाकाऱ्यांना निवेदनाची दखल घेऊन काम करून दिले प्रश्न मार्गी लावला म्हणून १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी होणाऱ्या निषेध लोटांगणला स्थगिती देत असल्याचे लेखी कळविले आहे.

## निकृष्ट दर्जाचे...

उचलुन भ्रष्टाचार करणार्या अभियंता व संबंधितावर गुत्तेदारावर कार्यवाही करावी या मागणीसाठी १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाइंचे शहर संघटक सचिव अक्षय कोकाटे अमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निदनात म्हटले आहे.

बीड नगर परिषद अंतर्गत नगरोत्थान महाअभियान व दलित वस्ती अंतर्गत शहरात सोलार पोल हायमास्ट दिवे बसविण्यात आले आहेत सदरील काम ५ कोटी २५ लाख ४३ हजार रुपयाचे होते (५,२५,४३,०००/-) होते परंतु सदर सोलार पोल ची किंमत सर्व साधारण ७० ते ७५ हजार अशी असतांना त्याची खरेदी २,९८,०००/- रुपये दाखवण्यात आलेली आहे. तसेच साबेर कन्स्ट्रक्शन पाटोदा यांच्याकडून बीड शहरात बसवण्यात आलेल्या सोलार पोलची किंमत अंमल २,०३,८००/- रुपये इतकी दाखवण्यात आली असून वास्तविक पाहता सदर पोला हा ६० ते ६५ हजार रुपये किमतीचा आहे. तसेच सदरचे सर्व साहित्य हे आय.एस.आय. मार्क असलेल्या कंपनीचे न वापरता लोकल कंपनीचे वापरले आहे. या पदध्तीने वरील कामात भ्रष्टाचार झाल्याचे उघडपणे लक्षात येते त्यामुळे वरील काम करणार्या दोन्ही कंपनीकडून भ्रष्टाचार करुन निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन न.प. बीड यांच्याशी संगनमत करुन बिले उचलन्यात आलेली आहेत. त्यामुळे दि. २८/०२/२०२५ ते १३/०३/२०२५ या कालावधीत

◆ पान ४ वरून पुढे...

झालेल्या वरील कामाची तात्काळ चौकशी करुन संबंधीतांवर योग्य ती कार्यवाही करावी. सदर प्रकरणी मी आपल्याकडे २८/०२/२०२५ रोजी व १३/०३/२०२५ व २२/०७/२०२५ रोजी वेळोवेळी निवेदने सादर केलेली आहेत. परंतू आपणाकडुन सदर कामाबाबत कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात आलेली नाही. उलट पक्षी न.प. बीड यांनी सदरील कामाच्या तक्रारी असतानांही संगनमताने बिले (देयके) दिलेली आहेत. तसेच बीड शहरातील प्रभाग क्र. ४ मध्ये एकुण ३ बौध्द विहार आहेत सदर बौध्द विहाराचे रिपेरिंग, रंगरंगोटी, इलेक्ट्रिक काम व इतर दुरुस्त्या करण्या कामी १ मार्च ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत अंदाज पत्रका आधारे काम न.प. अंतर्गत देण्यात आलेले होते परंतू प्रभाग क्र.४ मधील कोणत्याही बौध्द विहाराचे कसलेही काम झालेले नाही अशी परिस्थिती असतांना ९ ते १० लाख रुपये न.प. बांधकाम विभागाचे अभियंता किरण देशमुख व इतर कर्मचार्यांच्या संगनमताने सबंधीत काम न करता बिले उचलण्यात आलेली आहेत. अशा पध्दतीने शहरात अभियंता देशमुख यांच्या मार्फत भ्रष्टाचार केला जातो. सदर बाबींचा जाबा विचारला असता देशमुख अरेरावीची भाष करतात. करीता संबंधीत अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करुन गुन्हा नोंदवण्यात यावा. बीड शहरामध्ये अशा पध्दतीने होत असलेल्या भ्रष्टाचारामुळे विकासाच्या कामात खीळ बसत आहे. तसेच पैशाचा अपव्यय होत असून या सर्व भ्रष्टाचाराला तात्काळ आळा बसवणे गरजेचे असल्याने वरील प्रकरणी तात्काळ कार्यवाही करण्यात यावी या मागणीसाठी आपण रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली १५ ऑगस्ट २०२५ पासून आमरण उपोषणास बसणार असल्याचेही निवेदनात अक्षय कोकाटे यांनी म्हटले आहे.

## मोडकळीस आलेल्या ....

अजित पवार यांनी लक्ष न दिल्याने अखेर १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन ध्वजारोहणाच्या वेळी बीड दौऱ्यावर आलेल्या अजित पवार यांना काळे झेंडे दाखवून निषेध करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांना देण्यात आले आहे. ८ महिन्यांत ज्ञानमंदिरांना निधी द्यावा अजितदादा बीडची बारामती करा विमान उड्डाण आंदोलन आदी ३ वेळा लक्ष्यवेधी आंदोलने करूनही निधी न दिल्यामुळे आम्हाला काळे झेंडे दाखवण्याशिवाय पर्याय नाही, असे डॉ. ढवळे यांनी

◆ पान ४ वरून पुढे...

स्पष्ट केले.

## विविध सामाजिक...

वतिने शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले तर उपजिल्हा रुग्णालयात विशाल पवार यांच्या वतिने फळे वाटप करण्यात आले आहेत व करण जाधव यांच्याकडून शहरातील महिलांना छत्रीचे वाटप करण्यात आले यावेळी महिला आघाडी अध्यक्ष रत्नमालाताई मोटे, मा.नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे कानगुडे आप्पा, मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी,मधुकर वादे, भगवान घुबार्डे, याहीया खॉन, प्रमोद मोटे, गणेश मोटे, पत्रकार सुभाष सुतार, सुशील टकले, सय्यद आय्युबभाई, मा.नगरसेवक राम पवार, संजय इगळे, मुन्नासेठ, राजेंद्र आर्दड, कृष्णा काकडे, किशोर धोडलकर, जुनेद बागवान, भरत गायकवाड, महेश सौंदरमल, फाद चाऊस, विठ्ठल मोटे, दत्तात्रय जाधव, प्रदीप ननवरे, गोरख मोटे,योगेश मोटे,ऋषिकेश मोटे, बाबा वाघमारे, शौहेब आत्तार, लक्ष्मण चव्हाण, प्रकाश उपळकर, बाळासाहेब गायकवाड, सतिष पवार, भैय्या पवार,वाजेद पठाण, बाबा खरात, कृष्णा पाटोळे, सुदंर काकडे, कट्टुभाई फिटर, आकाश खाजेकर, सादेक चाचु, सय्यद माजेद, राणा कानाडे, शेख दस्तगिर, शेख रेहान, मगन परदेशी, शेख बाबा, सालम चाऊस, रणजीत कांबळे, बाळासाहेब उबाळे, पिंटु साळवे. पिंटु पानखडे, शिवाजी काळे, भाऊसाहेब बेद्रे, मुरली सुतार, विलास शिदे, पप्पुशेठ भोसले, विष्णु शेलार, मुन्ना मोटे, गणेश पवार, श्रीराम घाटुळ, बबन जाधव, दाऊद पठाण, शौकत पठाण, आदि सह पदाधिकाऱ्यांसह नागरिक व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## चकलांब्यात वाळू...

चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना करत कारवायाचे आदेश दिले.त्यानुसार पोलिसांनी छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे दोन टॅक्टर आले.त्यानुसार दोन्ही वाहने ठाण्यात आणण्यात आली असून या कारवाईत ११ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि

◆ पान ४ वरून पुढे...

संदीप पाटील si चांदमारे , पोशी / हनुमान इंगोले , पोशी / सुरेश सुरवसे , पोशी/२३१ प्रशांत कल्याण घोंगडे

## तलवाडा पोलीस...

टाळण्यासाठी त्याची रवानगी कारागृहात केल्याचे समजते. त्याच पध्दतिने दिनांक १३/८/२०२५ रोजी तलवाडा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलंगेकर साहेब यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक गायकवाड साहेब, पोलीस उपनिरीक्षक अन्नदास साहेब, पोलीस हवालदार मोहसीन शेख, पोलीस आमदार विठ्ठल राठोड, पोलीस आमलदार भीमसेन जाधव, पोलीस हवालदार काकडे यांनी जातेगाव येथून ४९६० रुपयाचा देशी दारू चा बॉटल स्वरूपातील मुद्देमाल जप्त करुन संबंधिता विरोधात तलवाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे.

## रिपब्लिकन पार्टी...

या पक्षाची बैठक संपन्न झाली. बैठकीप्रसंगी बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी बाळासाहेब मधुकर जाधव यांची निवड करण्यात आली. ही निवड रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे राष्ट्रीय नेते दीपक (भाऊ)निकाळजे यांच्या आदेशाने व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे यांच्या उपस्थितीत करण्यात आली.या निवडीमुळे बाळासाहेब जाधव यांच्यावर शुभेच्याचा वर्षाव होत आहे. या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे, मराठवाडा प्रवक्ता ज्ञानेश्वर गिरी, मराठवाडा संपर्कप्रमुख सौ आम्रपाली गजेशिव, महिला केज तालुका अध्यक्ष बचुटे मॅडम, महादेव केदार, किरण कसबे, विशाल नवगिरे, आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ...

रोजीचे करण्यात येणारे बेमुदत धरणे आंदोलन मागे घेण्यात आले असल्याचे जेष्ठ माजी नगरसेवक भिमराव वाघचौरे, ॲड विकास जोगदंड, माजी नगरसेविका पुजा गणेश वाघमारे, रत्नमाला बाबुराव दुधाळ, मिना बिबिशन लांडगे सह आदींनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून सांगितले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# कबुतरखान्यासंदर्भात मुंबई हायकोर्टाचा मोठा निर्णय; लोकांची भूमिका विचारात घेऊनच निर्णय घेतल्याचं कोर्टाचे स्पष्टीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील कबुतरखान्यासंदर्भात आज मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. सार्वजनिक आरोग्याला प्राधान्य देत मुंबईतील कबुतरखाने बंद करण्याचा निर्णय सरकारनं घेतलाय. मात्र काही संघटना आणि पक्षीप्रेमींनी या निर्णयाला हायकोर्टात आव्हान दिलं होतं. म




ात्र मुंबई हायकोर्टानंही बंदी कायम ठेवत कबुतरांना खाद्य टाकणा-यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. तसंच याबाबत एक तज्ज्ञांची समिती नियुक्त करण्याचे निर्देशही मागच्या सुनावणीत हायकोर्टानं राज्य सरकारला दिले होते. कोर्टाचे आदेश असतानाही काही लोकांनी कबुतरांना खाद्य टाकण्याचा प्रयत्न केल्यानं वातावरण तापलंय. त्यातच सुप्रीम कोर्टानं हस्तक्षेप याचिका फेटाळलीय. हायकोर्टात या संदर्भातील सुनावणीकडे सगळ्यांचे लक्ष होते. कबुतरखान्यांवर तुर्तास बंदी कायम असा निर्णय कोर्टाने जाहीर केला आहे.

सकाळी ६ ते ८ या काळात अटी आणि शर्थींसह कबुतरांना अन्न खाऊ घालू देण्याची मुंबई महापालिकेची तयारी आहे. मुंबई महापालिकेच्या वकिलांनी कोर्टात यासदंर्भात माहिती दिली. दादर कबुतखान्याकडून खाद्य घालण्याची मागणी आल्याचा खुलासा मुंबई महापालिकेने सुनावनी दरम्यान केला. केवळ तुमच्या मताचा विचार नका करू तर जे विरोध करतायत त्यांचाही विचार करा असे कोर्टाकडून सांगण्यात अल्याचे समजते. मुंबई महापालिकेने या संदर्भातील मतावर हरकती मागवा असा सूचना देखील कोर्टाने केल्या आहेत.

कबुतरांना खाद्य घालण्यासाठी रेसकोर्सचा विचार करण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली. मग उद्या शिवाजी पार्क,ओव्हल मैदानावरील देण्याची मागणी होईल असा आक्षेप कोर्टाकडून नोंदवण्यात आला. कंट्रोल फिडींगला परवानगी देण्यापूर्वी सार्वजनिक आरोग्याचा विचार करावा, नागरिकांच्या हरकती मागवाव्यात. पालिका थेट निर्णय घेऊ शकत नाही,त्यांनी सार्वजनिक आरोग्याचा विचार करावा. तसेच नागरिकांच्या हरकती देखील विचारात घ्याव्यात असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

## नियमित व्यायामामुळे आरोग्य सुदृढ व निरोगी राहते : प्रोफेसर डॉ. बालाजी नवले

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय युवक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये धारूर ग्रामीण रुग्णालयातील एचआयव्ही समुपदेशक श्री. प्रेमानंद स्वामी यांनी रासेयो स्वयंसेवकांची संवाद साधताना म्हणाले की, आरोग्य हीच खरी संपत्ती असून उत्तम आरोग्यासाठी उत्तम आहार, व्यायाम व योगा करणे गरजेचे. व्यायामाने मन प्रसन्न व उत्साही राहते असे सांगितले. आंतरराष्ट्रीय युवक दिनानिमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून प्रोफेसर डॉ. बालाजी नवले यांनी उत्तम आरोग्यदायी जीवनासाठी युवकांनी नियमितपणे व्यायाम करून जीवन निरोगी व आरोग्यदायी ठेवावे. तसेच हर घर तिरंगा घर घर तिरंगा याविषयी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना भारतीय ध्वज संहितेचे महत्त्व समजावून स्वयंसेवकांनी देशभक्ती जोपासावी असे सांगितले. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय युवक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

संपन्न भारतासाठी निरोगी व उत्तम आरोग्याने परिपूर्ण युवक निर्माण व्हावेत असे सांगितले. कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक सुभाष वायाळ, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर यांबरोबरच महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. नागोराव वाघमारे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी मानले.

## कुंबेफळ येथे विठ्ठल बिरुदेव भंडारा परज कार्यक्रम संपन्न

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुंबेफळ येथे प्रतीवर्षाच्या परंपरेनुसार यावर्षी रविवार रोजी श्री विठ्ठल बिरुदेवाच्या भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. धनगरी ओवीगायन कार्यक्रम संपन्न झाला. ढोल, झांज,अब्दागिरी व छत्री,आणि निशान पताका घेऊन सलग पाऊल खेळत ही भंडाऱ्याची उधळण करत परज निघाली. बिरुदेव वीर देवांचा हेडाम पार पडले त्यानंतर महाप्रसाद झाला या कार्यक्रमासाठी परिसरातील मोठ्या प्रमाणात वीरकरी नागरीक उपस्थित होते. गावातील ग्रामस्थ, सर्व क्षेत्रातील मंडळी मोठया संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.



## तिरंगा हा त्याग व देशभक्ती चे प्रतिक: रविंद्र बोराडे



### महिला महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' अभियान अंतर्गत ध्वजारोहण

**गेवराई । प्रतिनिधी**

राष्ट्रध्वजाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढण्याची शक्ती दिली. तिरंगा हा त्याग व देशभक्ती चे प्रतिक आहे. असे प्रतिपादन श्री. रविंद्र बोराडे यांनी केले. ते महिला महाविद्यालय, गेवराई येथील 'हर घर तिरंगा' कार्यक्रम अंतर्गत ध्वजारोहण प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार संपूर्ण देशांमध्ये 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई येथ माजी नगरसेवक श्री. रविंद्र बोराडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी प्रथम मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात करण्यात आले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, राष्ट्रध्वज हा त्याग व देशभक्तीचे प्रतिक असून राष्ट्रध्वजाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नागरिकांना ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढण्याची शक्ती देण्याचे कार्य केले आहे. तिरंगा ध्वजाच्या अस्मितेसाठी हजारो भारतीयांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण म्हणाले की, स्वातंत्र्य चळवळ सुरू असतानाच आपला राष्ट्रध्वज कोणता असावा यावर विचारमंथन होऊन २२ जुलै १९४७ रोजी संविधान सभेने वर्तमान राष्ट्रध्वजाचा स्वीकार केला. आपला राष्ट्रध्वज हा एकता, सार्वभौमत्व आणि गौरवशाली इतिहासाचे प्रतिक आहे. यावेळी 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या वतीने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बाबू वादे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. संगिता आहेर यांनी केले तर प्रा. रामहरी काकडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व स्वयंसेविका यांची उपस्थिती होती.

## महाराष्ट्रातील १५ सरपंच स्वातंत्र्यदिनी विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार ; ९ महिला सरपंचांचा समावेश

**मुंबई । प्रतिनिधी**

राजधानी दिल्ली येथे लाल किल्लूयावर १५ ऑगस्ट २०२५ रोजी होणाऱ्या ७९ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी देशभरातील २८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील २१० ग्रामपंचायत सरपंचांना विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील एकूण १५ सरपंचांचा समावेश असून यात ९ महिला सरपंच आहेत. १५ ऑगस्ट रोजी हे सर्व सरपंच लाल किल्लूयावरील स्वातंत्र्यदिन सोहळ्यास उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार ठरणार आहेत. महाराष्ट्रातून निवड झालेले ग्रामपंचायत सरपंच खालीलप्रमाणे आहेत: श्री. प्रमोद नरहरी लोंढे (लोंढेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर), श्रीमती जयश्री धनंजय इंगोले (खासळा नाका, ता. कामठी, जि. नागपूर), श्री. संदीप पांडुरंग ढेरंगे (कोरेगाव भीमा, ता. शिरूर, जि. पुणे), श्रीमती डॉ. अनुप्रिता सचिन भांडे (म्हातोडी, ता. अकोला, जि. अकोला), श्रीमती नयना अशोक भुसारे (भावसे, ता. शहापूर, जि. ठाणे), श्रीमती सुनिता दत्तात्रय मिटकरी (ढोरखेडा, ता. मालेगाव, जि. वाशिम), श्रीमती अपर्णा नितीन राऊत (कोंढाळा, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली), श्रीमती संजीवनी वैजनाथ पाटील (खर्डा, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर), श्री. चंद्रकुमार काशीराम बहेकार (भेजपार, ता. सालेकसा, जि. गोंदिया), श्रीमती रोमिला रामेश्वर बिसेन (केसलवाढा/पवार, ता. लाखनी, जि. भंडारा), श्री. सूरज संतोष चव्हाण (चिंचाळी, ता. दापोली, जि. रत्नागिरी), श्रीमती पार्वती शेषराव हरकल (कुंभारी, ता. जिंतूर, जि. परभणी), श्री. प्रमोद किसन जगदाळे (बिदल, ता. मान, जि. सातारा), श्री. शशिकांत माधवराव मांगले (कसबेगव्हाण, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती), श्रीमती प्रभावती राजकुमार बिराजदार (बामणी, ता. उदगीर, जि. लातूर) असे एकूण १५ सरपंच आहेत.

गुरुवारी १४ ऑगस्ट रोजी या विशेष अतिथींचा औपचारिक सत्कार होणार असून, यावेळी केंद्रीय पंचायती राज मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह, केंद्रीय राज्य मंत्री प्रा. एस. पी. सिंह बघेल आणि मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## आजच्या तिरंगा रॅली मध्ये सर्व बीड शहरातील जनतेने सहभाग नोंदवावा: अशोक लोढा

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्यदिन आणि पहलगाम हल्लयाचा बदला घेऊन भारतीय लष्कराने पाकिस्तानी आतंकवाद्यांच्या विरोधात ऑपरेशन सिंदूर अभियान राबवून आतंकवाद्यांच्या भ्याड हल्लयाचा सामना केला व त्यांचा समूळ नायनाट करण्याचे काम भारतीय सैनिकांनी केले आहे. आतंकवादयांचे मनसुबे उध्वस्त करत त्यांच्या मुस्क्या आवळणाऱ्या आपल्या शूरवीर भारतीय जवानांच्या गौरवार्थ त्यांना मानाचा मुजरा आणि नतमस्तक होऊन त्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक आणि अभिनंदन म्हणून स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत बीड शहरांमध्ये तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या राष्ट्राच्या कल्याणासाठी राष्ट्रप्रेमाचा संकल्प पुन्हा एकदा दृढ करूया. देशाचा विकास, सुरक्षा व देशवासीयांच्या कल्याणासाठी नेहमी समर्पित राहण्याची प्रतिज्ञा घेऊया.

मागील इतिहास पाहता स्वतःच्या प्राणाची चिंता न करता देशासाठी प्राणाचे बलिदान देण्यास कधीही तयार असतात. अशा या सैनिकांच्या सन्मानार्थ आजच्या रॅलीमध्ये सर्व पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिकांनी सहभागी व्हावे. ही रॅली सकाळी ९:३० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यापासून – सुभाष रोड – साठे चौक ते छ.शिवाजी महाराज यांचे पुतळ्यापर्यंत असणार आहे.

## गेवराई आश्रम शाळेत शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप

### पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात



**गेवराई । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसार आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी गेवराई आश्रम शाळेत आयोजित शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप सोहळा मंगळवारी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दिनेश लाला पवार (उपाध्यक्ष, आश्रम शाळा संघटना, महाराष्ट्र) यांनी भूषविले.

प्रमुख पाहुणे म्हणून संजय सोनवणे (नायब तहसीलदार, गेवराई), प्रवीणकुमार बांगर (पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गेवराई), सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ, पीएसआय प्रदीप सोळुंके, पत्रकार विनोद नरसाळे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक डी. एम. चव्हाण सर यांनी करून उपक्रमाचे उद्दिष्ट आणि शाळेच्या वाटचालीबद्दल माहिती दिली. त्यानंतर मान्यवर पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप करून शुभेच्छा दिल्या. दरम्यान आपल्या भाषणात नायब तहसीलदार संजय सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले व शैक्षणिक प्रगतीसाठी सदैव सहकार्याचे आश्वासन दिले. तसेच पोलिस निरीक्षक प्रविणकुमार बांगर, सपोनि संतोष जंजाळ आणि प्राचार्य आर.डी. पवार सर यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षणात अधिक जोमाने सहभाग घेण्याची प्रेरणा त्यांना मिळाली आहे. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन दीपक पवार सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन भारत तोंडे सर यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड जिल्हा फुटबॉल असोसिएशन तर्फे फुटबॉल स्पर्धेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यास आनंद होत आहे की, बीड जिल्हा फुटबॉल असोसिएशन बीड बीडच्या वतीने जिल्हा फुटबॉल साखळी स्पर्धा १४ ऑगस्ट ते १७ ऑगॉस्ट . २०२५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज स्टेडीयम बीड (जिल्हा क्रिडा संकुल) येथे आयोजीत करण्यात येणार आहे. या स्पर्धेतुन बीड जिल्हयाचा फुटबॉल संघ निवडला जाणार असुन सदर संघ आंतर जिल्हा फुटबॉल स्पर्धेत भाग घेण्यासाठी पाठविण्यात येणार आहे.

## बीड येथील श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी चालू असलेले श्रीमद भागवत कथेची मोठ्या उत्साहात सांगता

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर या ठिकाणी चालू असलेल्या श्रीमद् भागवत कथेची आज मोठ्या उत्साहामध्ये साधुसंतांच्या भाविक भक्तांच्या मोठ्या उपस्थितीमध्ये सांगता करण्यात आली या वेळी बीड शहरासह ग्रामीण भागातील भाविक भक्त प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने श्री कथा श्रवणासाठी व



महाप्रसादासाठी उपस्थित होते या कथेचे आयोजन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा देव देश आणि धर्म या साठी सातत्याने धार्मिक कार्यामध्ये अग्रेसर असलेले सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असलेले असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी या श्रीमंत भागवत कथेचे आयोजन केले होते या भागवत सप्ताह मध्ये सात दिवसांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे देखील आयोजकाच्या वतीने करण्यात आले होते सर्व भाविक भक्तांनी सात दिवस मनोभावे श्रीमद् भागवत ग्रंथ श्रवण केला आणि कथेच्या सांगते साठी मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि श्रीमद् भागवत कथा सांगते नंतर आयोजकाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते महाप्रसाद देखील सर्व लहान थोर भावी भक्तांनी सह नागरिकांनी घेतला या उत्कृष्ट धार्मिक कार्याच्या बाबतीत भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या कर्तव्याबद्दल सर्व भाविक भक्तांमधून समाधान व्यक्त होत आहे यावेळी उपस्थित असलेले सोमेश्वर मंदिर ट्रस्टचे सर्व विश्वस्त मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीवर कोट्यावधी उधळले!

बीड । प्रतिनिधी

बीडच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी गेल्या तीन वर्षांमध्ये शासकीय अधिकाऱ्यांच्या निवासस्थान दुरुस्तीच्या नावाखाली करोडो रुपयांचा घोटाळा केला आहे. वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या निवासस्थान असो कि कार्यालय दुरुस्ती असो या नावाखाली कोट्यावधी रुपये कार्यकारी अभियंता ते शाखा अभियंता यांनी घशात घातले आहेत. राज्याच्या तिजोरीच्या चाव्या हाती असणाऱ्या अजित पवार पालकमंत्री असलेल्या बीड जिल्ह्यात अधिकाऱ्यांनी जो मलिदा लाटला आहे त्याची तक्रार दादांकडे करण्यात आली आहे. बीड जिल्हा हा कोणत्या ना कोणत्या कारणामुळे सतत चर्चेत असतो गुंडगिरी असो दादागिरी असो वाळू माफी असो की लँड माफिया या कारणामुळे बीडची जेवढी बदनामी झाली आहे तेवढीच बदनामी भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या कारभारामुळे देखील झाली आहे. या सगळ्या प्रकारामध्ये माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मंत्री असलेल्या एका मंत्र्याच्या बीड जिल्यातील लाडक्या कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग असल्याची देखील माहिती सूत्रांनी दिली आहे. बीडच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे त्यांचे तत्कालीन पीए गौंड उपअभियंता चंद्रकांत बोराडे शाखा अभियंता ठाकूर आणि गव्हाणे या लोकांनी बीडच्या वेगवेगळ्या शासकीय कार्यालयाची दुरुस्ती आणि निवासस्थानांची दुरुस्ती यावर कोट्यावधी रुपयांची उधळण करत हे पैसे स्वतःच्या आणि गुत्तेदाराच्या खिशात घातले आहेत.

### १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्र्यांच्या घेरावासाठी जनतेला आवाहन : बाळासाहेब मोरे पाटील

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर आणि नर्स यांच्या हलगर्जीपणामुळे दि. १३ एप्रिल २०२५ रोजी प्रसूतीदरम्यान अतिरक्तस्त्राव होऊन मृत्यू झालेल्या छाया गणेश पांचाळ (रा. अंबिलवडगाव, ता. जि. बीड) यांना न्याय मिळावा, या मागणीसाठी आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. या प्रकरणाला चार महिने उलटूनही दोषींवर कोणतीही कारवाई झालेली नाही. सामाजिक कार्यकर्त्या किष्किंदाताई पांचाळ यांनी वारंवार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्याकडे लेखी व तोंडी पाठपुरावा केला, मात्र डॉ. संजय राऊत यांनी अर्थपूर्ण व्यवहारातून दोषी डॉक्टर व नर्स यांना पाठीशी घातल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. यापूर्वी पोलिस प्रशासनाने दि. ०५ ऑगस्ट रोजी या प्रकरणी तुमची चर्चा पालकमंत्री अजित पवार यांच्यासोबत घडवून आणू असा शब्द दिला होता. मात्र दि. ०७ ऑगस्ट रोजी ऐनवेळी पोलिसांनी बळाचा वापर करून किष्किंदाताईंना स्थानबद्ध केले. या घटनेने नातेवाईक व जनतेत संतापाची लाट पसरली आहे. त्यामुळे दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी माननीय पालकमंत्री अजित पवार यांना बीडमध्ये घेराव घालून न्यायाची मागणी करण्यात येणार असल्याचे शिवभिम विचारमंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी सांगितले. सर्व ओबीसी बांधवांनी आणि सर्वसामान्य नागरिकांनी गनिमी काव्याने मोठ्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालय, नगर रोड बीड येथे आंदोलनस्थळी उपस्थित राहून 'बीडच्या ओबीसी वाघीनिला' न्याय मिळवण्यासाठी खंबीर पाठबळ द्यावे, असे आवाहन पाटील यांनी केले.

### जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वतंत्र दिन दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी गोपाळकाला येत असून आरक्षण व इत्र मागणीच्या अनुषंगाने आमरण उपोषण होण्याची शक्यता आहे. तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

### बिजभांडवल योजना व थेट कर्ज योजनेसाठी ऑफलाईन अर्ज सादर करावेत

बीड । प्रतिनिधी

राज्यातील इतर मागासवर्गीय सर्वांगिण कल्याणासाठी कार्यरत असलेले महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ आणि या महामंडळा अंतर्गत विविध इतर मागास प्रवर्गातील कार्यरत १३ उपकंपन्या शासनाने स्थापन केलेल्या असून बीड जिल्हास्तरावरील कामकाज कार्यन्वित करण्यात आलेले असून या महामंडळ व उपकंपन्या मार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी २० टक्के बिज भांडवल कर्ज योजना, रु. १.०० लक्ष थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजना अशा एकूण सहा योजना राबविण्यात येत आहेत. यापैकी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजना या पुर्णपणे ऑनलाईन स्वरुपाच्या असून इतर मागास प्रवर्गातील पात्र अर्जदारास नाव नोंदणीसाठी महामंडळाच्या ु. ीललषवल.ेीस या वेबपोर्टवर आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. उर्वरीत बिजभांडवल योजना व थेट कर्ज योजना ह्या ऑफलाईन स्वरुपाच्या असून त्याचे अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.याबात अधिक माहितीकरीता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादीत, जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर, बीड-नगर रोड, बीड.

# सकाळी निवेदन दिले दुपारी प्रश्न लागला मार्गी

## १५ ऑगस्ट रोजी करण्यात येणाऱ्या निषेध लोटांगणला स्थगिती : रहेमान सय्यद

कडा । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील साबलखेड कडा आष्टी रस्त्यांचे काम दोन वर्षांपासून चालू असून या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी गटारी बनवतांना गटारीला पावसाचे पाणी जाण्यासाठी जागोजागी चार-चार इंचाची छिद्रे ठेवली होती. परंतु रस्ता बनवतांना ते सगळेच्या सगळे छिद्रे रस्त्यात बुजून टाकली. परिणामी दावलमलिक (शादवल) दर्गा समोर ५० फुटापेक्षा जास्त लांबीचे व २० फुटाच्या आसपास रूंदीत पावसामुळे कायमच चिखल - पाण्याचे ढव साचून राहत होते. त्यामुळे ये-जा करतांना कसरत करावी लागत होती.तर घसरून पडण्याची भिती, अपघाताची भिती यावर उपाययोजना करावी म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांनी वेळोवेळी अभियंता भोपळे सह संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना फोटो व्हिडिओ पाठवून संपर्क करून यावर लवकर उपाययोजना करावी म्हणून विनंत्या केल्या होत्या परंतु दखल घेतली नाही. म्हणून १२ ऑगस्ट २०२५ रोजी लेखी निवेदन देऊन आजपर्यंत दखल घेतली नाही याचा निषेध म्हणून १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ११:३० वाजता दर्गा समोर साचलेल्या चिखल-पाण्यात भोपळा,बेशरम घेऊन १५ मिनिंटे लोटांगण घेत निषेध व्यक्त करणार असल्याचे निवेदन १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता दिले आणि चमत्कार झाला. निवेदन सकाळी ११ वाजता दिले आणि काम दुपारी ३ वाजता करून दिले. इतक्या दिवसांपासून जो प्रश्न मार्गी लावण्यासाठी अभियंता व संबंधित कर्मचाऱ्यांना विनंती करण्यात

▶ उर्वरित पान २ वर

## निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन हायमास्ट दिवे बसविणाऱ्या गुत्तेदारावर कार्यवाही करा

**१५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासामेर रिपाइंचे शहर संघटक सचिव अक्षय कोकाटे करणार अमरण उपोषण**

● बुध्द विहाराचे काम न करता बोगस बीले उचलणार्या अभियंता व संबंधित गुत्तेदारावर तात्काळ कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान व दलित वस्ती योजनेमधुन बीड शहरात सोलार पोल हायमास्ट दिवे बसविणार्या कन्स्ट्रक्शन कंपनी कडून निकृष्ट दर्जाचे सामान वापरुन साहित्य खरेदीच्या भ्रष्टाचाराची तात्काळ चौकशी करुन संबधीत कन्स्ट्रक्शन कंपनीवर योग्य ती कार्यवाही करावी तसेच बीड शहरातील प्रभाग क्र. ४ मधील सम्यक बौध्द विहार, तथागत बोध्द विहार व जयभिम बौध्द विहारच्या रिपेअरिंग, रंगरंगोटी दुरुस्ती व इलेक्ट्रीक कामे न करता बिले

▶ उर्वरित पान २ वर

## मोडकळीस आलेल्या शाळांकडे पालकमंत्र्यांचे दुर्लक्ष; 15 ऑगस्टला अजितदादांना काळे झेंडे! : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी



जिल्हा परिषदेच्या ९४ शाळांना अजूनही इमारत नाही, तर ३८१ शाळांमधील तब्बल ६०७ वर्गखोल्या मोडकळीस आल्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. विद्यार्थी अगदी जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करत आहेत तर छताचा भाग कोसळुन विद्यार्थी जखमी झाल्याच्या घटना घडत आहेत. शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर करून दोन वर्षे उलटली, पण निधी अद्याप मंजूर झालेला नाही. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी वारंवार निवेदने, आंदोलने करूनही पालकमंत्री

▶ उर्वरित पान २ वर

## विविध सामाजिक उपक्रमाने शिवराज पवारांचा वाढदिवस साजरा

**रुग्णांना फळ वाटप, शालेय साहित्यांचे वाटप, छत्रीचे वाटप करण्यात आले**

गेवराई । प्रतिनिधी



शहरातील पवार कुटुंबाती युवक नेतृत्व शिवराज बाळराजे पवार यांचा वाढदिवसा निमित्त उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप तसेच शालेय साहित्यांचे वाटप व पावसाळ्याची गरज लक्षात घेऊन शहरातील महिलांना छत्रीचे वाटप करून शिवराज पवार यांचा धुमधडाक्यात वाढदिवस साजरा करण्यात आला आहे. आज दि.१३ ऑगस्ट रोजी शहरातील पाटील घराण्यातील युवक नेते शिवराज पवार यांचा वाढदिवसा निमित्त शहरातील साठेनगर येथील जायकवाडी जि.प.मा.शाळा येथे शेख राजु यांच्या

▶ उर्वरित पान २ वर

## चकलांब्यात वाळू तस्करांना पुन्हा दणका; 30, लाखांचा मुद्देमाल जप्त

चकलांबा । प्रतिनिधी



पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार चकलांब्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी पुन्हा वाळू तस्करांवर कारवाई केली आहे.गोदापात्रात केलेल्या या कारवाईत ३० लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी चकलांबा-पोलीस ठाण्यात १) बाळू पवार रा. गुळज व एक अद्यात अश्या ०२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी मागच्या काही दिवसांत वाळू तस्करांवर मोठ्या कारवाया केल्या आहेत. मंगळवारी देखील (दि.१२/०८/२५) रोजी देखील पंचांळेश्वर येथे नदी पात्रात दोन ट्रॅक्टर

▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत जातेगाव येथे दारू विक्रेत्यावर कार्यवाही

तलवाडा । प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत आणेक ठिकाणी विविध प्रकारचे अवैध धंदे चालत आसल्याचे सातत्याने बोलल्या जातय. आता गणरायाच्या आगमनाच्या आणुषंगाने शांतता कमेटीच्या झालेल्या बैठकीत उपस्थित झालेल्या अवैध दारू विक्रीच्या मुध्याला अनुसरण तलवाडा पोलीस स्टेशनचे कर्तव्य तत्पर सपोनी मनोज निलंगेकर व त्यांच्या सर्व स्टाफने हळु हळु आता अवैध प्रकारावर कार्यवाह्यांना सुरुवात केल्याचे दिसुन येत असुन काल एका ठिकाणाहुन तलवार जप्त करत आरोपीला अटक करुन त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करत गणपती बप्पाचे आगमन व ईदे मिलादुन्नबीच्या सनावरील सावट

▶ उर्वरित पान २ वर

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर )पक्षाच्या बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी बाळासाहेब जाधव यांची निवड



केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील उमरी या गावचे रहिवाशी बाळासाहेब मधुकर जाधव यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)या पक्षाच्या बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी निवड झाली आहे. याबाबतीत सविस्तर वृत्त असे की केज येथील शासकीय विश्राम ग्रह येथे दिनांक १२ रोजी दुपारी ३ वाजता ,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)

▶ उर्वरित पान २ वर

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) हा पक्ष अन्याय अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधात लढणारा आणि रस्त्यावर उतरून न्याय मागणार आहे, या पक्षाचे नेते आदरणीय दीपक (भाऊ) निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारा हा पक्ष आहे. विनाकारण कोणत्याही समाजावर अन्याय अत्याचार झाला तर हा पक्ष पूर्ण ताकतीने रस्त्यावर उतरेल, माझी बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी निवड केल्याबद्दल राष्ट्रीय नेते दीपक (भाऊ)निकाळजे व मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. - बाळासाहेब जाधव (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख)**

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी अखेर मंजूर

**नगरसेवक वाघचौरे, जोगदंड,वाघमारे, दुधाळ,लांडगे यांच्या मागणीला यश ; १५ ऑगस्ट रोजी करण्यात येणारे बेमुदत धरणे आंदोलन स्थगित**

बीड । प्रतिनिधी



१३ ऑगस्टलोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत अनु. जातीच्या लोकसंख्येनुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा निधी मंजुर होऊन देखील योजनेच्या अनुषंगाने नगरपरिषद बीड यांना प्रस्ताव सादर करणेबाबत पत्रान्वय आदेशित केले नसल्याने राखीव प्रभागाचे प्रतिनिधित्व करणारे माजी नगरसेवक भिमराव वाघचौरे, ॲड विकास जोगदंड, माजी नगरसेविका पुजा गणेश वाघमारे, रत्नमाला बाबुराव दुधाळ, मिना बिबिशन लांडगे यांनी प्रशासकीय स्तरावर वारंवार निवेदन देऊन पाठवपुरावा करत अनुसूचित जातीच्या समाज बांधवांवर व राखीव प्रभागावर अन्याय होऊ नये तसेच अनुसूचित जातीच्या वस्त्या विकासापासून वंचित राहू नये.

अनुसूचित जाती प्रभागातील विकासकामे जलद गतीने पूर्ण करण्यात यावे या मागणीसाठी लोकशाही मार्गाने १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला होता तसा इशारा देखील ५ ऑगस्ट रोजी जेष्ठ माजी नगरसेवक भिमराव वाघचौरे, ॲड विकास जोगदंड, यांचे सह शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून दिला होता. सदरील निवेदनाची प्रशासकीय स्तरावरून तातडीने दखल घेऊन लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचे नियतव्यय मंजूर केले असून मंजुर निधीच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करणे बाबत मुख्याधिकारी नगर परिषद बीड यांना कळवले आहे तसेच बेमुदत धरणे आंदोलन करण्या पासून परावृत्त होऊन प्रशासनास सहकार्य करावे असे जिल्हा नगर प्रशासनाच्या वतीने पत्राद्वारे कळविण्यात आले असल्याने १५ ऑगस्ट

▶ उर्वरित पान २ वर